महाराष्ट्र शासनाचा २००८-२००९ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी बुधवार, दिनांक १९ मार्च २००८ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

**सुधारित अंदाज २००८-०९.** १. मार्च २००७ मध्ये सन २००७-०८ चा अर्थसंकल्प सादर करतांना रुपये २०१७.२९ कोटींची शिल्लक राहील असा अंदाज व्यक्त केला होता. सुधारित अंदाजात रुपये २९८१.३६ कोटींची शिल्लक दिसते. वर्षारंभाची रुपये - १०.९४ कोटींची प्रत्यक्ष शिल्लक हिशेबात घेतल्यास वर्ष अखेरची शिल्लक रुपये २९७०.४२ कोटी इतकी राहील.

**अर्थसंकल्पीय अंदाज २००८-०९.** २. सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये पुढे दर्शविल्याप्रमाणे रुपये ४६०८.९६ कोटींची शिल्लक राहील असा अंदाज आहे :—

(रुपये कोटीत )

| | |
|---|---|
| (अ) महसुली विभाग— | |
| जमा . . . . | ७९,९१०.८६ |
| खर्च . . . . | ७८,९४६.१६ |
| शिल्लक . . | ९६४.७० |
| (ब) भांडवली विभाग— | |
| जमा . . . . | १८,९९६.२६ |
| खर्च . . . . | २०,६१६.४५ |
| तूट . . | १,६२०.१९ |
| (क) लोकलेखा (निव्वळ)— . . | २,२९४.०३ |
| (ड) एकूण | |
| जमा (अ + ब + क) . . . . | १०१,२०१.१५ |
| खर्च (अ + ब) . . . . | ९९,५६२.६१ |
| शिल्लक . . | १,६३८.५४ |
| सुरुवातीची शिल्लक . . | २,९७०.४२ |
| एकूण शिल्लक . . | ४,६०८.९६ |

वार्षिक योजना सन २००८-०९ बाबत योजना आयोगाशी झालेल्या चर्चेच्या आधारे या वर्षाच्या योजनेचे आकारमान रुपये २५,००० कोटी निश्चित करण्यात आले आहे. सदर एकूण नियतव्ययापैकी रुपये २२७१४.१३ कोटी नियतव्यय त्या त्या क्षेत्राखाली अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे, आणि उर्वरित रुपये २२८५.१७ कोटीचा नियतव्यय नियोजन विभागांतर्गत ठोक तरतूद म्हणून अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

**विक्रीकराचे प्रशासन.**

**३.** मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीला येत्या ३१ मार्चला तीन वर्षे पूर्ण होतील. नवीन करपद्धती आता स्थिरावली आहे. प्रशासनातील त्रुटींसंबंधी औद्योगिक व व्यापारी संघटना तसेच करसल्लागारांच्या संघटना यांच्याकडून वेळोवेळी निवेदने येत असतात. त्यांचीही दखल घेण्यात येते. विभागाच्या संगणकीकरणाचा उपक्रम या वर्षी पूर्णत्वास जाईल. त्यामुळे येत्या काही महिन्यानंतर विभागाची कार्यक्षमता वाढविणे शक्य होईल. कागदोपत्री काम करण्याची आवश्यकता कमी झाली की इतर महत्त्वाच्या कामासाठी जास्त वेळ मिळू शकेल.

**मूल्यवर्धित कर: प्रगतीचा आढावा.**

**४.** आता मूल्यवर्धित कर पद्धतीद्वारा मिळणारा महसूल व त्यातील वाढ यांचा थोडक्यात आढावा घेतो. मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली २००४-०५ या वर्षी एकंदर रुपये १२०६६ कोटी इतका महसूल जमा झाला होता आणि २९६ कोटी रुपयांचे परतावे करदात्यांना दिले होते. तसेच २०८ कोटी रुपयांचे परतावे केंद्रीय विक्रीकरापोटी समायोजित झाले. म्हणजेच निव्वळ महसूल ११५६२ कोटी रुपयांचा होता. नवीन पद्धतीमध्ये पहिल्या आणि दुस-या वर्षी अनुक्रमे १३०१६ कोटी रुपये आणि १६४८४ कोटी रुपये इतका महसूल जमा झाला आहे. या वर्षी २०,००० कोटी रुपये इतका महसूल जमा होईल असा अंदाज आहे. नवीन पद्धतीच्या पहिल्या दोन वर्षात अनुक्रमे १६३७ कोटी रुपये व २०३२ कोटी रुपयांचे परतावे दिले गेले.

तसेच ८०० कोटी रुपये आणि १२९५ कोटी रुपयांचे परतावे समायोजित केले. या वर्षी एकूण २६०० कोटी रुपयांचे परतावे दिले जातील असा अंदाज आहे आणि १८०० कोटी रुपयांचे परतावे समायोजित करण्यात येतील असे वाटते. पहिल्या दोन वर्षांचा निव्वळ महसूल अनुक्रमे १०५७९ कोटी रुपये व १३१५७ कोटी रुपये इतका आहे. या वर्षीचा अंदाजित निव्वळ महसूल १५६०० कोटी रूपये आहे. २००४-०५ या वर्षीचा निव्वळ महसूल विचारात घेतला तर निव्वळ महसूल वाढीचा सरासरी वेग १०.५० टक्के आहे. जुलै व ऑगस्ट २००५ मधील अतिवृष्टी व महापूर यामुळे महसूल वाढीचा वेग कमी दिसतो. नवीन पध्दतीच्या पहिल्या वर्षी म्हणजे २००५-०६ साली मूल्यवर्धित कराचा मिळालेला निव्वळ महसूल १०५७९ कोटी रुपयांचा होता आणि त्या आधीच्या वर्षी म्हणजे २००४-०५ मध्ये निव्वळ महसूल ११५६२ कोटी रुपयांचा होता. म्हणजेच नवीन पध्दती आल्याबरोबर महसूल कमी झाला. परंतु २००५-०६ हे कमी महसूल मिळालेले वर्ष पायाभूत धरले तर नंतरच्या दोन वर्षात मूल्यवर्धित कराचा निव्वळ महसूल वाढीचा वेग २१.४३ टक्के राहिला आहे.

मागील आर्थिक वर्षात विभागाला सर्व अधिनियमाखाली मिळून २५०६२ कोटी रुपये इतका निव्वळ महसूल मिळाला. या वर्षी सर्व अधिनियमाखाली मिळून २८३४६ कोटी रुपये इतका निव्वळ महसूल मिळेल असा अंदाज आहे.

**मूल्यवर्धित करापोटी नुकसान भरपाई.**

५. मूल्यवर्धित कर पद्धतीच्या अंमलबजावणीमुळे महसूलात घट आल्यास त्यापोटी नुकसानभरपाई देण्याचे केंद्र शासनाने मान्य केले होते. नवीन पद्धतीच्या फक्त पहिल्या तीन वर्षांसाठी नुकसानभरपाई मिळणार आहे. येत्या १ एप्रिलपासूनच्या कालावधीसाठी नुकसानभरपाई मिळणार नाही. २००६-०७ या वर्षासाठीची भरपाई आणि २००७-०८ या वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांसाठीची भरपाई यापोटी नुकसान

भरपाईची एकत्रित मागणी सुमारे ४५०० कोटी रुपयांची आहे. ही रक्कम मुख्यत: पुढच्या वर्षी आणि काही प्रमाणात या वर्षी मिळेल अशी अपेक्षा आहे.

**केंद्रीय विक्रीकर : दरातील घट.**

६. आंतर-राज्यीय विक्रीवर केंद्रीय विक्रीकराची आकारणी होते. सध्या प्रचलित असलेला केंद्रीय विक्रीकर पूर्णपणे काढून टाकावा असे राष्ट्रीय पातळीवर ठरले आहे. त्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून १ एप्रिल २००७ रोजी केंद्रीय विक्रीकराचा दर ४ टक्केवरून कमी करून ३ टक्के करण्यात आला. या वर्षी १ एप्रिल २००८ रोजी हा दर अजून कमी करून २ टक्के करण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केलेली आहे. यामुळे राज्य शासनाच्या महसूलात जी घट येईल ती भरून काढण्याचेही केंद्र शासनाने मान्य केले आहे. नुकसान भरपाई कोणत्या स्वरुपात देण्यात येईल याचे तपशील सध्या ठरत आहेत.

**वस्तू व सेवांवरील कर.**

७. अप्रत्यक्ष करांच्या सुधारणेमधला पहिला टप्पा म्हणजे मूल्यवर्धित करपध्दतीची अंमलबजावणी हा होय. सुधारणांचा अंतिम टप्पा म्हणजे भारतामध्ये वस्तू व सेवांवर एकत्रित पद्धतीने कर आकारणी सुरु करणे नवीन कर पद्धती लागू करणे इष्ट आहे या वर केंद्र शासन व भारतातील सर्व राज्य शासने यांचे आता एकमत झाले आहे. केंद्र शासनातर्फे आकारण्यात येणारा सेवा कर व उत्पादन शुल्क तसेच राज्य शासनांतर्फे आकारण्यात येणारा विक्रीकर व सेवा व वस्तूंवरील इतर कर यांच्याऐवजी हा नवीन कर लावण्यात येईल. अप्रत्यक्ष करांच्या आकारणीमधील स्वातंत्र्याच्या साठ वर्षातील ही सर्वात महत्त्वाची घटना असेल. एप्रिल २०१० पासून नवीन कर पध्दती चालू होईल याचा केंद्रीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात पुनरुच्चार केला आहे.

**जुन्या निर्धारणा.** ८. मुंबई विक्रीकर अधिनियम व त्याबरोबर निरसित झालेले इतर अधिनियम याखालील निर्धारणेचे काम मोठया प्रमाणात प्रलंबित आहे. हे काम शक्य तितक्या लवकर संपवून सर्व अधिकारी व कर्मचारी मूल्यवर्धित कराच्या कामांसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे. हया दृष्टीने कोणत्या प्रकारच्या निर्धारणा पूर्ण करणे आवश्यक आहे यासंबंधीच्या सूचना विक्रीकर विभागाला पूर्वी दिलेल्या होत्या. या सूचनांमध्ये थोडा बदल करायचे मी ठरविले आहे. त्यानुसार कोणत्याही प्रकरणात पहिल्या किंवा शेवटच्या वर्षासाठी निर्धारणा करायची की नाही याचा निर्णय विक्रीकर विभागात प्रशासकीय स्तरावर घेतला जाईल.

**इलेक्ट्रॉनिक विवरणपत्र.** ९. सर्व करदात्यांना नियतकालिक विवरणपत्रे भरावी लागतात. विवरणपत्रासोबत जर काही रक्कम भरणे आवश्यक असेल तर विवरणपत्र राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये दाखल करायचे असते. विवरणपत्रासोबत जर रक्कम भरावयाची नसेल किंवा परतावा घ्यायचा असेल तर असे विवरणपत्र विक्रीकर कार्यालयात दाखल करायचे असते. या पद्धतीमध्ये विवरणपत्रांमधील माहिती एकत्र करणे, माहितीची छाननी करणे इत्यादी गोष्टी शक्य होत नाहीत. याचा विचार करून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने इंटरनेटद्वारा विवरणपत्र भरण्याची नवीन पद्धती या वर्षापासून चालू करण्यात येईल. सुरुवातीला ही पद्धत मोठया करदात्यांसाठीच असेल. परंतु थोडयाच महिन्यांत मासिक विवरणपत्र भरणा-या सर्वच करदात्यांसाठी ही पद्धत लागू करण्यात येईल. नवीन पद्धतीमुळे विवरणपत्र भरण्यात कसूर करणारे व्यापारी लगेचच नजरेस येतील.

**सर्वेक्षण : प्रशासकीय सवलत.** १०. अनोंदीत व्यापा-यांना शोधून त्यांची नोंदणी करण्यासाठी विक्रीकर विभागातर्फे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. काही प्रकरणे अशी असतात की सर्वेक्षणामध्ये सापडलेल्या व्यापाऱ्याने मूल्यवर्धित

कर अधिनियमाखाली नोंदणीपत्र घेतलेले नसतेच; पण आता निरसित झालेल्या मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली देखील तेव्हा आवश्यक असले तरी नोंदणीपत्र घेतलेले नसते. मूल्यवर्धित कराची वसूली करणे आवश्यकच आहे. परंतु मुंबई विक्रीकर अधिनियमाखालील देय रक्कम मात्र दुर्लक्ष करण्याइतपत असते. या पार्श्वभूमीवर मी ठरविले आहे की सर्वेक्षणात सापडलेल्या अनोंदीत फेर विक्रेत्यांसाठी मुंबई विक्रीकर अधिनियमापुरती आणि निरसित झालेल्या इतर अधिनियमांखाली एक प्रशासकीय सवलत द्यावी. प्रस्तावित सवलतीचे तपशील विक्रीकर आयुक्त जाहिर करतील.

**वजावटीतील घट.**

११. मूल्यवर्धित करपद्धतीमध्ये जसा प्रत्येक टप्प्यावर विक्रीवर कर लागतो तसेच प्रत्येक खरेदीवर भरलेल्या कराची पूर्ण वजावट मिळणे अभिप्रेत असते. परंतु भारताची राजकीय रचना संघराज्याच्या स्वरूपाची असल्याने या नियमाला थोडे अपवाद करावे लागतात. वजावटीच्या नियमांमध्ये अशा तरतुदी केलेल्या असतात की काही प्रकारच्या व्यवहारांमध्ये वजावटीत घट केली जाते. सध्या ही घट केंद्रीय विक्रीकराचे सर्वसाधारण दराइतकी म्हणजेच ३ टक्के इतक्या दराने केली जाते. केंद्रीय विक्रीकराचा दर १ एप्रिल २००८ पासून ३ टक्केवरून कमी होउन २ टक्के होणार आहे. तेंव्हा वजावटीच्या नियमांमध्ये ३ टक्के दराने घट किंवा २ टक्के दराने घट अशा पध्दतीचे उल्लेख न करता केंद्रीय विक्रीकराच्या प्रचलित दराप्रमाणे वजावटीमध्ये घट होईल अशी तरतूद करण्याचे मी ठरविले आहे.

**करांचे दर: माफी आणि सवलती.**

१२. महाराष्ट्रामध्ये धान्य, डाळी, हळद, मिरची इत्यादी वस्तू पहिल्यापासूनच करमुक्त आहेत. खरे तर करांच्या दराबाबत असलेल्या राष्ट्रीय सहमतीप्रमाणे मूल्यवर्धित करपद्धतीमध्ये या वस्तूंवर कर लावणे उचित झाले असते. परंतु नवीन करपद्धती अंमलात आणतांना या गोष्टी मी करमुक्तच ठेवल्या होत्या. करमाफीची मुदतदेखील

वेळोवेळी वाढविण्यात आली आहे. राष्ट्रीय पातळीवर वस्तू आणि सेवा यांवर एकत्रित कराची आकारणी १ एप्रिल २०१० पासून चालू व्हायची आहे. त्यावेळी सर्व राज्यांमध्ये नवीन कराचे दर समान असतील. या गोष्टींचा विचार करून मी ठरविले आहे की गहू, तांदूळ, डाळी, त्यांचे पीठ, गूळ, हळद, चिंच, धणे, मेथी, मिरची, सुवा, नारळ, ओले खोबरे, सोलापूरी चादर, पापड, खजूर व टॉवेल्स या वस्तूंवरील सध्याची करमाफी आणि चहा, सुकामेवा, मनुका व बेदाणे या वस्तूंवरील सध्याची करसवलत ३१ मार्च २०१० पर्यंत कायम ठेवावी.

**विमानासाठी लागणाऱ्या इंधनावरील कर.**

**१३.** महाराष्ट्रात नागपूर, औरंगाबाद, अमरावती, अकोला, नांदेड अशी अनेक ठिकाणे व्यापार व उद्योग यांच्या वाढीची केंद्रे होऊ लागली आहेत. मोठी शहरे सोडून राज्याच्या अशा इतर भागात विमान वाहतुकीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. विमानकंपन्यांच्या जमाखर्चात इंधन हा एक महत्त्वाचा घटक असतो. तेंव्हा मी असे ठरविले आहे की येती दोन वर्षे मुंबई आणि पुणे वगळून उर्वरीत महाराष्ट्रात एव्हिएशन टर्बाईन फ्युएलच्या विक्रीवर सवलत देऊन २५ टक्केऐवजी ४ टक्के इतक्या दराने कर आकारणी करावी.

**इमारती लाकूड.**

**१४.** बांधकामासाठी लागणारे लाकूड मुख्यत: इतर देशांतून आयात केले जाते. अनेक वेगवेगळया कारणांमुळे लाकडाची आयात महाराष्ट्रामार्फत होण्यापेक्षा इतर राज्यांमधून होऊ लागली आहे. परंतु स्थानिक व्यापाराला प्रोत्साहन देणे अगत्याचे आहे. कारण इमारती लाकडाचा वापर बांधकाम क्षेत्रात कच्च्या मालाप्रमाणे होतो. म्हणून मी ठरविले आहे की, इमारती लाकडावरचा कराचा दर १२.५ टक्क्यावरुन कमी करुन ४ टक्के करावा. ही सवलत एक वर्षाकरता चालू राहील.

कार्यकंत्राट कर: जमिनीची किंमत.

१५. एखादी इमारत बांधली जात असेल तर ते बांधकाम कार्यकंत्राट समजून त्यावर कर आकारणी करावी लागेल असे निर्णय कोर्टांनी दिले आहेत. इमारतीतले गाळे विकत घेण्यासाठी करण्यात येणारे करारनामे इमारतीचे बांधकाम संपण्यापूर्वी झाले असतील तर या कराची आकारणी होते. परंतु कराची आकारणी करताना जमिनीच्या किंमतीवर कर लागणार नाही याची खबरदारी घेणे जरुर आहे. या साठी आवश्यक त्या तरतूदी करण्याचे मी ठरविले आहे.

प्रवेश कर.

१६. सध्या पेट्रोलियम पदार्थांवर प्रवेश कर आकारला जातो. मला असे समजते की वातानुकूलित यंत्रे आणि टाईल्स या वस्तूंचे उत्पादन महाराष्ट्राच्या बाहेर होते आणि येथील ग्राहकाला त्या वस्तू विकल्या जातात. या वस्तू महाराष्ट्रात वापरल्या तरी त्यांच्यावर कर लागत नाही. ही करातील तूट भरुन काढण्यासाठी या वस्तूंवर प्रवेश कराची आकारणी करायचे मी ठरविले आहे.

प्रवासी कर.

१७. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सेवा राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली आहे. राज्यातील मोठी शहरे देखिल बससेवेने जोडलेली आहेत. महामंडळाच्या वातानुकूलित बसेसवर प्रवासी कराची आकारणी १७.५ टक्के दराने होते. एक विशेष बाब म्हणून महामंडळाच्या टप्पा पध्दतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वातानुकूलित बसेसवरील प्रवासी कराचा दर कमी करुन ५.५ टक्के करण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. खाजगी वाहतूक करणाऱ्या प्रवासी वाहनांवरील प्रवासी करात थोडी वाढ करण्याचे देखिल मी प्रस्तावित करतो. वातानुकूलित स्लीपर कोच, वातानुकूलीत बस व अखिल भारतीय पर्यटक परवाना असलेली अवातानुकूलीत बस यांचेवर प्रतिवर्ष प्रतिआसन कर आता रुपये ७,०००, रुपये ६,५०० आणि यथास्थिती रुपये ५,५०० इतका असेल.

**मुद्रांक शुल्क : कराच्या दरातील बदल.**

१८. जमीन विकसित करण्यासाठी केलेल्या विकसन करारावर किंवा मुखत्यारपत्रावर अनुक्रमे अनुच्छेद ५(ग-अ)(१) व अनुच्छेद ४८(ग) प्रमाणे जमिनीच्या किंमतीच्या १ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारले जाते. यापुढे या दोन्ही दस्तांवर खरेदी खताप्रमाणे म्हणजेच अनुच्छेद २५ प्रमाणे मुद्रांक शुल्क लागेल.

सध्या मोबदला देऊन घेतलेल्या मुखत्यारपत्रास अनुच्छेद ४८(फ) नुसार खरेदीखताप्रमाणे शुल्क लागते. आता मी असे ठरविले आहे की जेव्हा मिळकत हस्तांतरीत करण्याचे अधिकार देणारे विनामोबदला मुखत्यारपत्र दिले जाईल, तेंव्हा अशा मुखत्यारपत्रांना देखील याच अनुच्छेदाप्रमाणे शुल्क लागू होईल. याला एक अपवाद म्हणजे जेव्हा असे विनामोबदला मुखत्यारपत्र जवळच्या नातेवाईकास दिले जाईल तेंव्हा त्यावर केवळ ५०० रुपये इतकेच शुल्क द्यावे लागेल.

**खराब मुद्रांकाकरिता परतावा.**

१९. मुद्रांक खराब झाले किंवा वापरात येऊ शकत नसतील तर त्यांच्याबाबतीत मुद्रांक शुल्काचा परतावा मिळू शकतो. छपाई व इतर अनुषंगिक खर्च वाढल्यामुळे परतावा देतेवेळची वजावट २ टक्के वरुन वाढवून १० टक्के करण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

**गहाणखत.**

२०. पीककर्ज १० हजार रुपयांपर्यंत असेल तर कर्जासाठी केलेल्या गहाणखतावर मुद्रांक शुल्क लागत नाही. परंतु कर्ज काढण्याचे काम शेतकऱ्याला सोपे झाले पाहिजे. त्यासाठी होणारा खर्च देखील कमी झाला पाहिजे. याकरीता माफीवरील १० हजार रुपयांची मर्यादा काढून टाकण्याचे मी ठरविले आहे. पीककर्ज कितीही रकमेचे असले तरी त्याच्या गहाणखतावर मुद्रांक शुल्क लागणार नाही. यामुळे वार्षिक ८० कोटी रुपयांची महसूल हानी होईल.

**मुद्रांक शुल्काचे समायोजन.**

२१. विकासकाकडून जर एखादे घर किंवा गाळा विकत घेण्याचा करार केला आणि कराराच्या तारखेपासून तीन वर्षाच्या कालावधीत

त्या घराची किंवा गाळयाची फेरविक्री केली तर फेरविक्री दस्तावर मुद्रांक शुल्क भरतांना पहिल्या विक्री करारावर भरलेल्या मुद्रांक शुल्काच्या रकमेचे समायोजन केले जाते. नफेखोरीच्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी कमी करुन एक वर्ष करण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

**मुद्रांक शुल्क: अभय योजना.**

२२. जागा खरेदी करणारे नागरीक सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करतात. परंतु अनेक वेळा इमारत ज्या जमिनीवर उभी असते त्या जमिनीचे हस्तांतरण झालेले नसते. अशा वेळी सदनिका धारकांना पूर्ण मालकी हक्क मिळत नाही. ह्या अडचणी सोडविण्यासाठी अलिकडेच कायद्यात आवश्यक ती सुधारणा केली आहे. सुधारणेची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची नेमणूक होईल.

ज्या इमारतीची खरेदी बऱ्याच पूर्वी झाली आहे त्या इमारतीखालील जमिनीचे आता हस्तांतरण करतांना आजच्या दराने मुद्रांक शुल्क भरावे लागल्यास ते अन्यायकारक होईल. याचा विचार करता प्रश्न सोडविण्यासाठी एक अभय योजना लागू करणे आवश्यक झाले आहे. योजनेचे तपशील स्वतंत्रपणे जाहिर होतील

**मोकळया जमिनीवरील कर.**

२३. नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम निरसित झाला आहे. विकास योजनांमध्ये ज्या जागा रहिवासी, व्यापारी किंवा औद्योगिक हेतूंकरिता राखून ठेवल्या असतात त्या जागांचा उपयोग दीर्घकाळपर्यंत केला जात नाही. ह्यामुळे कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या गटांना परवडतील अशा किंमतीमध्ये घर देणे अजूनच अवघड होईल. तेव्हा मोकळया जागांवर कर लावण्यासाठी एक विधेयक सादर केले जाईल. जे लोक जागा विकसित करण्याची परवानगी घेऊन नंतर विहित वेळेत बांधकाम करत नाहीत त्यांना हा कर भरावा लागेल.

**ई-पेमेंट गेटवे पद्धत.**

२४. मला सांगण्यास आनंद होत आहे की, करदात्यास करभरणा हा थेट त्वरेने शासनाच्या खाती ई-पेमेंट गेटवेद्वारे करण्याची सुविधा यावर्षी उपलब्ध केली जाईल. यामुळे करदात्यास इंटरनेटच्या माध्यमातून केव्हाही व कुठूनही कराचा भरणा सुलभरित्या करता येईल. यासाठी वेगवेगळया कर नियमात ज्या सुधारणा आवश्यक आहेत त्या या वर्षी करण्यात येतील.

**अर्थसंकल्पीय प्रस्तावांचा परिणाम.**

२५. आज मी जे सूट द्यायचे प्रस्ताव मांडले आहेत त्या सर्वांमुळे सुमारे १४२ कोटी रुपयांची महसूल हानी होईल. तर करविषयक प्रस्तावांमुळे सुमारे ३६७ कोटी रुपयांचा महसूल मिळेल. एकंदरीत २२५ कोटी रुपयांचे निव्वळ महसूली उत्पन्न या प्रस्तावांमुळे मिळेल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**